# फळसेवाडी हितकारी संस्था
## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : शनिवार १७ जून २०१७.
**स्थळ** : १४ कर्मचारी निवास, शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल, अंधेरी – पूर्व, मुंबई – ४०० ०५३.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे – अध्यक्ष | 10. श्री गुरुनाथ गणपत राणे (आमंत्रित) |
| 2. श्री सुनिल सदानंद राणे – सचिव | 11. श्री विश्वास ज्ञानदेव राणे (आमंत्रित) |
| 3. श्री उदय भगवान राणे – खजिनदार | 12. श्री सुनिल विनायक राणे (आमंत्रित) |
| 4. श्री दशरथ दत्ताराम साटम | 13. कुमारी तृप्ती अविनाश राणे (आमंत्रित) |
| 5. श्री पांडुरंग सावजी राणे | 14. श्री संदिप मोहन राणे ( आमंत्रित) |
| 6. श्री शंकर बाळकृष्ण राणे | 15. श्री लवू शिवाजी राणे (आमंत्रित) |
| 7. श्री रंजन रावजी म्हसकर | . |
| 8. श्री अशोक दत्ताराम राणे | |
| 9. श्री उत्तम वामन राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारिणीची सभा संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांचे निवासस्थानी (शहाजीराजे भोसले क्रिडा संकुल येथे) घेण्यात आली. सभेस कार्यकारीणीतील ९ सदस्य तसेच ६ आमंत्रित ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री सुनिल सदानंद राणे, सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करताना विषयपटलावरील विषय उपस्थितांस वाचून दाखविले.

विषय क्रमांक १ अंर्तगत दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेच्या कच्च्या इतिवृत्तावर चर्चा करण्यात आली. श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी उपस्थितांस सांगितले की श्री विश्वास ज्ञानदेव राणे यांनी नोदविल्या मतानुसार इतिवृत्त हे जरी सविस्तरपणे मांडण्यात आले असले तरी बऱ्याच काळानंतर संस्थेची सभा होत असल्यामुळे सर्व बाबी सविस्तर मांडण्याची आवश्यकता वाटल्यामुळे इतिवृत्त सविस्तर मांडले आहे. तसेच श्री विश्वास ज्ञानदेव राणे यांनी मांडलेले काही मुद्दे योग्य असून तांत्रिक कारणांनुसार त्याबद्दल नोंद इतिवृत्तामध्ये करण्यात येऊ शकत नाही तरी आपणांस योग्य वाटल्यास आपण पाठविलेले पत्र हे इतिवृत्ताचा भाग म्हणून संलग्न करण्यात येईल. या खुलाश्याने श्री विश्वास ज्ञानदेव राणे यांचे समाधान झाले व त्यांनी त्यांचे मुद्दे मागे घेत असून त्यांचे पत्र इतिवृत्ताबरोबर संलग्न करू नये अशी सूचना केली.

तसेच कुमारी तृप्ती अविनाश राणे यांनी इतिवृत्तावर केलेल्या सूचनांसंबधी त्यास स्पष्टीकरण देण्यात आले की त्यांनी मांडलेले सर्व मुद्दे इतिवृत्तामध्ये आलेले असून सूचविलेले बदल हे इतिवृत्त मांडणी तसेच भाषेसंबधी आहेत. कुमारी तृप्ती अविनाश राणे यांस विनंती करण्यात आली की त्यांस आवश्यक वाटत असलेले बदल त्यांच्या भाषाशैलीत वापरून इतिवृत्त सुटसूटीत करून दिल्यास इतिवृत्त सुधारता येऊ शकेल. परंतू कुमारी तृप्ती अविनाश राणे यांनी त्या

कार्यकारीणीच्या तसेच संस्थेच्या सदस्या नसल्यामुळे इतिवृत्तामध्ये सुधारणा करण्यास असमर्थता दर्शविली. श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी स्पष्ट केले प्रत्येकाची भाषाशैली वेगळी असल्यामुळे सर्वांच्या अपेक्षेप्रमाणे इतिवृत्त लिहीता येणे कठीण असते त्यामुळे कुमारी तृप्ती अविनाश राणे यांनी सुधारणा करून दिल्यास त्यांस आवश्यक वाटणारे बदल इतिवृत्तात घडविता येतील अन्यथा आहे त्याप्रमाणे इतिवृत्त वितरीत करावे लागेल. कुमारी तृप्ती अविनाश राणे यांनी पुन्हा इतिवृत्तामध्ये बदल करुन देण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे उपस्थितांनी इतिवृत्तास अंतिम स्वरुप देऊन ते मंजूर केले आणि इतिवृत्त वितरीत करण्याची सूचना केली.

विषय क्रमांक २ अंर्तगत श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी अध्यक्षांच्या परवानगीने आर्थिक वर्ष १९९५ – ९६ ते आर्थिक वर्ष २०१६ – १७ या २२ वर्षांचा ताळेबंद उपस्थितांपुढे मांडताना सांगितले की मागिल सर्वसाधारण सभेत उपस्थितांनी कार्यकारीणीने संस्थेची हिशेबपत्रके सादर केलेली नाहीत हा मुद्दा उपस्थित केला होता. संस्थेच्या सभासदांच्या या मुद्याची पूर्तता करण्यासाठी मागील २२ वर्षाची हिशेबपत्रके पूर्ण करण्यात आली असून आजच्या या सभेत कार्यकारीणीच्या मंजूरीकरीता ठेवण्यात आलेली आहेत. कार्यकारीणीच्या मंजूरीनंतर या हिशेबपत्रांचे लेखापरीक्षण करण्यात येईल. श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी उपस्थितांस सांगितले की या हिशेबपत्रकानुसार दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी संस्थेस सभासदांकडून रु.६८,४६५/- इतकी सभासद वर्गणी येणे असून संस्थेच्या बँक ऑफ इंडियाच्या खात्यामध्ये रु.४४,५५०/- आणि खजिनदारांकडे रु.९,२३०.५५ शिल्लक आहे. त्यानंतर या हिशेबपत्रकांवर उपस्थितांकडून आलेल्या प्रश्नांवर चर्चा करण्यात येऊन हिशेबपत्रके मंजूर करण्यात आली. उपस्थितांनी श्री दशरथ दत्ताराम साटम यांस हिशेबपत्रकांचे लेखापरीक्षण करून घेण्याची सूचना केली व पुढील सर्वसाधारण सभेत ही हिशेबपत्रके सभासदांच्या मंजूरीसाठी मांडण्याची सूचना केली. तसेच या २२ वर्षाच्या हिशेबपत्रांच्या प्रती सभासदांस वितरीत न करता शक्य असल्यास संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध कराव्यात अशी सूचना करण्यात आली.

विषय क्रमांक ३ अंर्तगत सचिवांनी उपस्थितांस गेली कित्येक वर्षे प्रतिक्षेत असलेला गाडीतळ ते टेंब (पांडूरंग सावजी राणे यांचे घर) हा वाहन रस्ता ग्रामपंचायतीने गाव नमुना क्रमांक २३ मध्ये नोंद करून घेतला असल्याची माहीती दिली. संस्थेच्या दप्तरी ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आलेल्या नोंदीची कागदपत्रे असून संस्थेकडून या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण लवकर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील अशी माहिती दिली.

विषय क्रमांक ४ अंर्तगत सचिवांनी उपस्थितांस सांगितले की १५ एप्रिल २०१७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत गणपती उत्सवादरम्याण गावी सार्वजनिक दिवाबत्तीची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करण्यात येईल अशी माहीती देण्यात आली होती. यासंबधी श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी माहिती दिली कि वाडीतील ग्रामस्थ श्री विजय संभाजी राणे यांनी त्यांचे ओळखीतील कंपनीकडून / व्यक्तीकडून एल इ डी दिवे सवलतीच्या दरात मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे तरी त्यांचेशी संर्पक करून हे एल ई डी दिवे मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. यासर्दंभात झालेल्या चर्चेनंतर या कामाची जबाबदारी श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी घ्यावी असे उपस्थितांनी सूचविले. तसेच नवीन फंडाची उभारणी होईपर्यंत संस्थेकडे उपलब्ध असलेल्या फंडातून या खर्चाची तरतूद करावी या प्रस्तावास उपस्थितांनी मंजूरी दिली.

विषय क्रमांक ५ अंर्तगत माहीती देताना सचिवांनी सांगितले की मे. टेरा हायड्रोटेक सोल्यूशन कंपनी कडून सर्वेक्षणाचा अहवाल प्राप्त झाला असून त्या अहवालानूसार आपल्या वाडीतील परीसरात बोअरवेलव्दारे पाणीपुरवठा करण्यासाठी पूरेसा पाणीसाठा उपलब्ध नाही परंतू पारंपारिक विहीर बांधल्यास पुरेसा पाणीसाठा उपलब्ध होऊन नळयोजना राबविता येणे शक्य आहे. सचिवांनी पुढे सांगितले की मे. टेरा हायड्रोटेक कंपनीच्या बिलापैकी एकून रु.३५,०००/- या बिलापैकी रु.१८,०००/- इतकी रक्कम देणे शिल्लक आहे. दिनांक १५ एप्रिल २०१७ रोजी घेण्यात आलेल्या

सर्वसाधारण सभेत हा खर्च करण्यास मंजूरी मिळालेली असुन, उर्वरीत रक्कमेची तरतूद करावयास हवी. उपस्थितांनी मे. टेरा हायड्रोटेक सोल्युशन कंपनीची शिल्लक रु.१८,०००/- संस्थेच्या फंडातून वापरण्यास मंजूरी दिली. यावर श्री मंगेश मनोहर राणे यांनी माहिती दिली की संस्थेचे बँकेतील खाते सध्या वापरात नसल्यामुळे या खात्यातून धनादेश दिला जाऊ शकत नाही त्यामुळे ही उर्वरीत रक्कम तातपुरती मी माझ्या स्वत:कडून देईन व नंतर खाते वापरात आल्यावर संस्थेकडून माझ्या रक्कमेचा भराणा करून घेईन. उपस्थितांनी श्री मंगेश मनोहर राणे यांच्या या प्रस्तावास मान्यता दिली.

विषय क्रमांक ६ अंर्तगत सचिवांनी श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी तयार केलेला सभासद नोंदणीसाठी आवश्यक असलेल्या नोंदणी फार्म व पावती पुस्तकांचा नमुना उपस्थितांस दाखविला. या नमुन्यांवर चर्चा करण्यात येऊन आलेल्या सूचना विचारात घेऊन या नमुन्यास अंतिम स्वरुप देण्यात आले. फार्म व पावती पुस्तकांची छपाई करून घेण्याची जबाबदारी श्री दशरथ दत्ताराम साटम यांचेवर सोपविण्यात आली.

विषयक क्रमांक ७ अंर्तगत सचिवांनी उपस्थितांस सांगितले कि सभासद नोंदणीसाठी कार्यकारीणी सदस्यांची / ग्रामस्थाची विभागवार नियुक्ती करावयास हवी जेणेकरून कार्यकारीणी सदस्यांस ग्रामस्थापर्यंत पोहोचणे सुलभ होईल व लवकरात लवकर सभासद नोंदणी अभियान पूर्ण होऊ शकेल. त्यानंतर चर्चेनतंर खालील कार्यकारीणी सदस्यांची / ग्रामस्थांची विभागवार नियुक्ती करण्यात आली.

| क्रमांक | विभाग | कार्यकारीणी सदस्यांचे नाव | संर्पक क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | फळसेवाडी आणि कणकवली | श्रीमती अनुजा अरुण राणे | |
| | | संकेत रत्नाकर राणे | 9420901061, 8412877357 |
| | | रामदास मारुती राणे | 9420757658 |
| 2 | दहिसर आणि बोरिवली | दशरथ दत्ताराम साटम | 9820114723 |
| | | उदय भगवान राणे | 9869472115 |
| 3 | कांदिवली आणि मालाड | रंजन रावजी म्हसकर | 9867940675 |
| | | उदय भगवान राणे | 9869472115 |
| 4 | गोरेगाव आणि जोगेश्वरी | जयवंत नाना राणे | 9969123695, 9867564066 |
| | | शंकर बाळकृष्ण राणे | 9869431620 |
| 5 | अंधेरी, साकिनाका, विलेपार्ले आणि सांताक्रुझ | गुरुनाथ गणपत राणे | 9869836825 |
| | | सुनिल सदानंद राणे | 9969807456 |
| 6 | परेल, ताडदेव, वरळी, डिलाईल रोड आणि काळाचौकी | दिलिप मधुकर राणे | 9969100979 |
| | | संदिप मोहन राणे | 9323216992 |
| | | प्रविण मनोहर राणे | |
| 7 | घाटकोपर, कांजूरमार्ग, पवई आणि कुर्ला | पांडूरंग सावजी राणे | 9920511595, 9821287010 |
| | | स्वप्निल पांडूरंग राणे | 9819733553 |
| 8 | भांडूप आणि मुलूंड | अशोक दत्ताराम राणे | 9819152075, 9869446625 |
| | | स्वप्निल पांडूरंग राणे | 9819733553 |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | ऐरोली, कोपरखैरणे, नेरुळ, वाशी आणि नवी मुंबई | हेमंतकुमार रमेश राणे | 9594934278, 9764964009, 9028644154 |
| 10 | भाईंदर, नायगाव, नालासोपारा, वसई, विरार आणि पालघर | सुनिल विनायक राणे | 9869803344 |
| | | गंगाराम महादेव राणे | |
| 11 | दिवा, डोंबिवली आणि ठाणे (बदलापूर सहित) | उत्तम वामन राणे | 9773705029, 9867516970 |
| | | लवू शिवाजी राणे | 9967883728 |
| 12 | शिवडी आणि वडाळा | लवू शिवाजी राणे | 9967883728 |
| 13 | कर्जत, महाड | दशरथ दत्ताराम साटम | 9820114723 |

सचिवांनी श्री दशरथ दत्ताराम साटम यांस नेमणूक करण्यात आलेल्या कार्यकारीणी सदस्यांस / ग्रामस्थास सभासद नोंदणीचे फार्म व पावती पूस्तके छपाई करून पाठविण्याची सूचना केली. तसेच विभागवार नेमणूक करण्यात आलेल्या सदस्यांस सभासद नोंदणी अभियान लवकरात लवकर पूर्ततेस नेण्याचा प्रयत्न करावा अशी विनंती केली.

विषय क्रमांक ८ अंर्तगत संस्था करत असलेल्या कार्यक्रमाची माहीती श्री नारायणराव राणे व आमदार श्री नितेश नारायणराव राणे यांस देऊन आमदार फंडातून किंवा त्यांच्या वैयक्तीक फंडातून काही निधी उपलब्ध होतो का याची चाचपणी करण्याची करण्याचे ठरविण्यात आले. आमदारांची भेट मिळविण्याची जबाबदारी श्री रंजन रावजी म्हसकर यांनी स्विकारली. संस्थेतर्फे एक निवेदन श्री नितेश नारायणराव राणे यांस देण्याचे ठरविण्यात आले आणि निवेदन तयार करण्याची जबाबदारी श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी घ्यावी अशी सूचना करण्यात आली.

सभासदांकडून / ग्रामस्थांकडून संस्थेस कोणत्याही सूचना / पत्रव्यवहार झालेला नसल्याची माहीती सचिवांनी दिली. त्यापुढे सचिवांनी उपस्थितांस इतर विषयांबद्दल विचारणा केली असता उपस्थितांकडून कोणतेही नविन विषय / योजना मांडण्यात आल्या नाहीत.

विषयपटलावरील कामकाजाचे विषय संपल्यावर संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी उपस्थितांस सांगितले की वैयक्तिक कारणांमुळे ते संस्थेच्या कामकाजासाठी पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत आणि यामुळे संस्थेच्या अध्यक्षपदाचा ते राजीनामा देऊ इच्छितात. त्यानंतर त्यांनी त्या अनुशंगाने त्यांचे राजीनामापत्र सचिवांकडे सुपूर्द केले. उपस्थितांकडून त्यास विनंती करण्यात आली की सध्या आपण संस्था पुनरुज्जीवित / कार्यरत करण्याचा प्रयत्न करत आहोत. सभासदांनी उपस्थित केलेल्या पश्नांचे आणि मुद्याचे निराकारणही करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या कारणांमुळे आपण यावेळी राजीनामा देऊ नये. सचिवांनी सांगितले की लवकरच आपण सभासदांची सभा बोलविण्याचा प्रयत्न करू व त्यावेळी आपल्या पत्रावर चर्चा करून निर्णय घेता येईल तो पर्यत आपले राजीनामा पत्र कार्यकारीणीच्या दप्तरी राहील. श्री मंगेश मनोहर राणे यांनी ही बाब मान्य केली.

त्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून सचिवांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

या कार्यक्रमाचा चहापाणी खर्च संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांनी केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

---